महाराष्ट्र शासन

**शिक्षण आयुक्तालय**

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे ४११ ००१.

**दूरध्वनी क्र.:** ०२०-२६१२०४४१ **ई मेल-** educom-mah@mah.gov.in

---

क्र. आशिका/आस्था-अ/२०२५/१०२/ I/1270478/2025. दि. 02/06/2025.

प्रति,

१) राज्य प्रकल्प संचालक
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

२) संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

३) मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सर्व.

४) शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.)

५) शिक्षण संचालक (प्राथमिक)

६) शिक्षण संचालक (योजना)

७) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य.
शिक्षण मंडळ, पुणे.

८) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.

९) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व.

विषय : दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर मेडिकल तपासणी करुन
खोटया प्रमाणपत्रधारक उमेदवारांवर कारवाई करणेबाबत.

दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे व मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांचे पत्रानुसार राज्यात खूप मोठया प्रमाणात दिव्यांगत्त्वाचे बोगस प्रमाणपत्र घेऊन बरेच शासकीय, निमशासकीय सेवेत दाखल झालेले आहेत. बोगस प्रमाणपत्रांमुळे खऱ्या दिव्यांगांवर अन्याय होत आहे. यासाठी दि. १९ जुलै २०१४ ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत "बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान" राबविण्यात आले होते. सदर अभियानातून शासकीय व निमशासकीय सेवेत विविध विभागांमध्ये बोगस प्रमाणपत्राद्वारे नियुक्ती मिळालेल्या काही उमेदवारांची नावे निदर्शनास आली आहेत. तसेच बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे शासकीय सेवेत नियुक्ती मिळविल्याच्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि. १४ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देश व तरतुदीनुसार आपल्या कार्यालयामध्ये/विभागामध्ये दिव्यांग प्रमाणपत्राद्वारे नियुक्त झालेल्या तसेच पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्राची खातरजमा करून घेऊन त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Sachindra Pratap Singh
Date: 31-05-2025 14:11:42

आयुक्त (शिक्षण) पुणे.

प्रत माहितीसाठी,

मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.